नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १२३ Issue - 123 | वार शनिवार दि. २० सप्टेंबर २०२५ Blow- Saturday Date 20 September 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मणिपूरमध्ये आसाम रायफल्सच्या ३३ जवानांच्या तुकडीवर गोळीबार

## दोन जवान शहीद झाल्याची माहिती; ४ जवान जखमी, घटनेमुळे उडाली खळबळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इम्फाळ : मणिपूरमध्ये आसाम रायफल्सच्या ताफ्यावर अज्ञात इसमांनी गोळीबार केला आहे. या गोळीबारात २ जवान शहीद झाले आहेत. तर काही जवान जखमी झाल्याची माहिती समोर येत आहे. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. मणिपूरच्या बिष्णूपूर जिल्ह्यात शुक्रवारी संध्याकाळी घडली. अज्ञातांनी हल्ला केला त्या ताफ्यात आसाम रायफल्सचे एकूण ३३ जवान होते. अज्ञात आरोपींनी केलेल्या हल्ल्यात २ जवान शहीद झाले आहेत. तर ४ जवान गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यानंतर संबधित परिसरात पोलीस आणि सुरक्षा दलाच्या जवानांची मोठी फौज घटनास्थळी दाखल झाली आहे. सध्या परिसरात हल्लेखोरांचा शोध सुरु आहे. या घटनेबाबत अधिकाऱ्यांनी माहिती दिली आहे. संबंधित घटना ही आज संध्याकाळी पाच ते सहा वाजेच्या दरम्यान घडली.



आसाम रायफल्सचे जवान इम्फाळ येथून विष्णूनगर जिल्ह्यात जात होते. यावेळी एका टोळीने जवानांच्या ताफ्यावर हल्ला केला. या हल्ल्यानंतर हल्ला करणारे पळून गेले. यानंतर स्थानिक नागरीक आणि पोलिसांनी जखमी जवानांना तातडीने रुग्णालयात नेले. पण तोपर्यंत उशिर झाला होता. २ जवानांचा तोपर्यंत मृत्यू झाला होता. तर इतर ४ जवानांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. मणिपूरचे माजी मुख्यमंत्री एन वीरेन सिंह यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. नाम्बोल सबल लेईकाई या परिसरात आमच्या आसाम रायफल्सच्या ३३ बहादूर जवानांवर हल्ला झाल्याची बातमी ऐकून स्तब्ध झालो आहे.

दोन जवानांचं हौतात्म्य आणि अनेक जवानांच्या जखमी झाल्याच्या घटनेने आम्हाला मोठा धक्का बसला आहे. या घटनेतील शहीद जवानांच्या कुटुंबाप्रती माझ्या संवेदना आहेत. जखमींनी लवकर बरे व्हावे, अशी प्रार्थना करतो. त्यांचं साहस आणि बलिदान सदैव आमच्या हृदयात राहील. या निर्घृण कृत्यातील दोषींवर कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी एन वीरेन सिंह यांनी केली आहे. या हल्ल्यामागे कोण आहे? याची माहिती अद्याप समजू शकलेली नाही. याशिवाय कुणाकडून या हल्ल्याची जबाबदारी घेण्यात आलेली नाही. संबंधित परिसरात मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. तिथे आता शोध मोहीम राबवली जात आहे. दरम्यान, मणिपूरमध्ये ३ मे २०२३ ला जातीय आरक्षणावरुन मोठा हिंसाचार भडकला होता. या हिंसाचारानंतर जवानांवर हा पहिला मोठा हल्ला आहे.

# बेताल वक्तव्यांवरून राजकारण तापले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्रजींनी गोपीचंद पडळकर यांना बेताल वक्तव्याबद्दल समज दिल्यानंतरही त्यांनी माफी मागितलेली नाही. देवेंद्रजींनी स्वतः पडळकर यांना फोन करून अशा खालच्या भाषेतील वक्तव्यांमुळे लोकांना आणि जनतेला आवडत नाही, असे स्पष्ट केले. महाराष्ट्र हे सुसंस्कृत राज्य असून, कोणत्याही पक्षाकडून, मग तो भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस, उभाटा गट किंवा काँग्रेस पक्ष असो, अशा पद्धतीची भाषा होता कामा नये, असे मुख्यमंत्री देवेंद्रजींनी सांगितले. संजय राऊत यांच्या वक्तव्यांवर उद्धव ठाकरे यांनी कधी समज दिली नाही, यावरही चर्चा झाली. पक्षाची प्रतिमा मलिन होत असल्याने अशा वक्तव्यांवर पावले उचलणे आवश्यक आहे, असे अनेकांचे मत आहे.



राजकारणात सर्वांनीच भाषेचे तारतम्य बाळगले पाहिजे. एकमेकांच्या वडिलांबद्दल, आईबद्दल अशा पद्धतीची वक्तव्य कोणीच करू नये, असे या चर्चेत नमूद करण्यात आले. अशा वक्तव्यांचे समर्थन कोणीही करत नाही. सर्वपक्षीय नेत्यांकडून खालच्या भाषेचा वापर केला जात असल्याने राजकारणाचा दर्जा घसरत चालला आहे, हाच या संपूर्ण चर्चेचा मुख्य मुद्दा आहे. महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीवर गरळ ओकत सुटलेल्या भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांची जीभ पुन्हा एकदा घसरली आहे. गोपीचंद पडळकर यांची जीभ राष्ट्रवादीच्या नेत्यांविषयी बोलताना सातत्याने घसरतच गेली आहे. त्यांनी आता हद्दच केली असून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्यावर गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या टीकेनंतर राज्याच्या राजकारणातून चौफेर टीका होत आहे. सोशल मीडियामधूनही गोपीचंद पडळकर यांच्या वक्तव्याचा समाचार घेतला जात आहे.

### फडणवीसांची नेत्यांना समज

जयंत पाटील यांनी अनुल्लेखानं मारलं

दरम्यान, जयंत पाटील यांना गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या टीकेविषयी विचारला असता, जयंत पाटील यांनी अनुल्लेखानं मारलं. जयंत पाटील सांगलीमध्ये एका कार्यक्रमासाठी आले असता त्यांना पडळकर टीकेबाबत विचारणा झाली असता यावेळी मी काही बोलणार नाही, जे काय चाललंय ते तुम्हीच बघा, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली. या विषयावर बोलणं टाळत जयंत पाटील निघून गेले.

कोणी मोकळीक दिली हे पाहिलं पाहिजे

मात्र, सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी मात्र गोपीचंद पडळकर यांचा बोलवता धनी कोण? कोणी मोकळीक दिली हे पाहिलं पाहिजे असं म्हणत तोफ डागली आहे. विशाल पाटील यांनी वसंतदादा पाटील यांच्यावरूनही पडळकर यांना प्रत्युत्तर दिलं आहे. राज्याच्या विकासामध्ये वसंतदादा पाटील यांचं काय योगदान आहे याचं सर्टीफिकेट गोपीचंद पडळकर यांच्याकडून घेण्याची गरज नसल्याचं विशाल पाटील यांनी म्हटलं आहे. विशाल पाटील म्हणाले की जिल्ह्यातील काही लोकांकडून जी वक्तव्य होत आहे त्यामागे कोण आहे, या व्यक्तीला फूस कोण देतं हे पाहिलं पाहिजे असं ते म्हणाले.

दरम्यान, महाराष्ट्राचे राजकारणामध्येही पडळकर यांच्या वक्तव्यानंतर संतप्त प्रतिक्रिया उमटली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून सुनावलं आहे. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी सुद्धा पडळकर यांची कानउघडणी केली आहे. मात्र, इतकं होऊनही पडळकरांची मग्रुरी कमी झालेली नाही. माफी मागण्याचा कोणताच प्रश्न नसल्याचे म्हटलं आहे.

# रेल्वे कर्मचारी मनोजकुमार यांच्या मृत्युची बातमी ऐकताच पत्नी सलोनी यांनी काचेच्या सहायांने गळा कापून घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : पतीच्या मृत्यूनं हादरलेल्या पत्नी थेट मृतदेहा जवळच स्वतःवर जीवघेणा वार करत स्वतःचं जीवन संपवण्याचा प्रयत्न केल्याची हृदयद्रावक घटना बुधवारी रात्री अक्कलकोट सरकारी रुग्णालयात घडली.

सलोनी मनोजकुमार यादव (वय २१, रा. दुधनी रेल्वे स्टेशन) आणि त्यांचे पती मनोजकुमार यादव यांचा सुखी संसार सुरू होती. मनोजकुमार हे रेल्वेच्या इलेक्ट्रिकल विभागात तंत्रज्ञ म्हणून कार्यरत होते.बुधवारी दुधनीजवळील रेल्वेच्या ओव्हरहेड इक्युपमेंटच्या दुरुस्तीच्या कामात असताना त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला.त्यांना अक्कलकोटच्या रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आलं, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

पतीला पाहावयाला आलेल्या सलोनी यांना ही मृत्यु झाल्याची बातमी माहित झाली. तेव्हा पतीच्या जाण्यानं दुखावलेल्या सलोनी यांनी रुग्णालयाच्या दरवाज्याचा काच तोडून स्वतःच्या गळ्यावर मारून घेत जीवन संपवण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं.आता त्यांची प्रकृती स्थिर आहे.



आज सायंकाळी मनोज कुमार यांच्या पार्थिवावर त्यांच्या बिहार येथील राहत्या गावी अंत्यसंस्कार करण्यात आलं.

त्यांच्या मूळगावी पार्थिव पाठवण्यासाठी वरिष्ठ मंडल अधिकारी,सोलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य कल्याण निरीक्षक सचिन बनसोडे, महावीर निमणी,प्रणव पावडे, अमर झा यांनी विशेष परिश्रम घेतलं. त्यांनी पार्थिव सोलापूरहून हैदराबाद पर्यंतरेल्वेंने तर हैद्राबादहून विमानाने पार्थिव पटना येथे नेण्यात आलं. तिथं रेल्वेच्या दुसऱ्या टीमनं त्यांचं पार्थिव गावी नेलं. आज त्यांच्या स्वंतगावी पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्याची माहिती मिळाली.

### शालेय शिक्षण विभाग आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडीया दरम्यान सामंजस्य करार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# ‘केंब्रिज’सोबतचा सामंजस्य करार जागतिक दर्जाच्या शिक्षणाचा नवा टप्पा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात विद्यार्थी आणि शिक्षकांची संख्या मोठी असून केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडियाकडे कौशल्य आहे. दोघांमधील सामंजस्य करार हा राज्यातील शालेय शिक्षणाला जागतिक दर्जा प्राप्त होण्यासाठीचा नवा टप्पा ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत शालेय शिक्षण विभाग आणि केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडीया दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. या करारावर केंब्रिजच्या वतीने आंतरराष्ट्रीय शिक्षण गटाचे व्यवस्थापकीय संचालक रॉड स्मिथ आणि राज्याच्या वतीने शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल यांनी स्वाक्षरी केली. शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, मुख्यमंत्री कार्यालयाच्या अपर मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार, मुख्यमंत्री कार्यालयाचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन, केंब्रिजच्या दक्षिण आशियाचे वरिष्ठ उपाध्यक्ष आणि व्यावसायिक प्रमुख मनीष दोषी आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानंतर पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळविण्याच्या दिलेल्या संधीच्या दिशेने महाराष्ट्राने प्रवास सुरू केला आहे. या करारामुळे केंब्रिजचे कौशल्य आणि राज्यातील शिक्षण क्षेत्र एकत्र आल्याने विद्यार्थ्यांना असे शिक्षण मिळवून देता येईल. या करारामुळे तो प्रवास अधिक फलदायी ठरेल. केंब्रिज हे शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठे नाव असल्याचे नमूद करताना त्यांनी, केंब्रिजने शिक्षण क्षेत्रात विकसित केलेल्या चांगल्या पद्धतींमुळे राज्यातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला. आज आपण सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे, तथापि हे पहिले पाऊल असून अजून मोठा प्रवास बाकी आहे. या प्रवासात आपण केंब्रिजसोबत भागीदार राहणार आहोत. मी स्वतः या कराराच्या अंमलबजावणीवर लक्ष ठेवणार असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

‘केंब्रिज’सोबतचा करार शालेय शिक्षणात ऐतिहासिक पाऊल – डॉ. पंकज भोयर

महाराष्ट्र राज्य प्रशासन, पायाभूत सुविधा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांत सातत्याने नवे आदर्श निर्माण करत आहे. आज केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंटसोबत झालेल्या सामंजस्य करारामुळे शालेय शिक्षणात जागतिक दर्जाकडे एक पाऊल पुढे टाकले गेले आहे, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी यावेळी सांगितले. हा करार विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारा आणि नव्या पिढीतील नाविन्यपूर्ण व नेतृत्वक्षम तरुणांना दिशा देणारा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राज्यात पीएम श्री स्कूल्स सुरू असून त्या शाळा शैक्षणिक उत्कृष्टता, कौशल्य विकास आणि सर्वांगीण शिक्षणासाठी आदर्श ठरणार आहेत. आपल्या शासकीय व अनुदानित शाळांमध्ये लाखो सामान्य कुटुंबातील मुले असामान्य स्वप्ने पाहतात. या मुलांना केवळ शिक्षण नव्हे तर दर्जेदार गुणवत्ता प्रमाणपत्र मिळावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. आजच्या करारामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शिक्षण मिळण्याकडे आपण पुढे पाऊल टाकले असल्याचे डॉ. भोयर म्हणाले.

या ज्ञान भागीदारीतून हवामान शिक्षण, अभ्यासक्रम सुधारणा, ग्रंथालय व शैक्षणिक साधनसंपत्ती उपलब्ध करून देणे, शिक्षक क्षमतावृद्धी आणि ओपन स्कूलिंग उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. ही मोहीम केवळ गुणपत्रिका सुधारण्यापुरती मर्यादित नसून विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, कौशल्य व जागतिक स्तरावरील तयारी देण्यासाठी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील ‘विकसित भारत’ दृष्टीकोनातून महाराष्ट्र शिक्षण क्षेत्रात देशाचे नेतृत्व करेल, असा विश्वास डॉ. भोयर यांनी व्यक्त केला. केंब्रिजसोबतच्या करारासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठिंबा दिल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

प्रधान सचिव देओल यांनी प्रास्ताविकात या कराराबाबत माहिती दिली. तर, केंब्रिजचे रॉड स्मिथ यांनी महाराष्ट्र शासनासोबतचा करार हा आमचा सन्मान असल्याची भावना व्यक्त करुन शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले. हा करार इतर राज्यांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

केंब्रिज आणि शालेय शिक्षण यांच्यातील सामंजस्य कराराविषयी

शालेय शिक्षण विभाग व केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस अँड असेसमेंट इंडीया यांच्यातील सामंजस्य करार हा महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार शिक्षकांच्या सतत व्यावसायिक विकासावर भर देणे आवश्यक आहे. राज्यातील शिक्षकांना प्रशिक्षण देताना परिणामकारकता व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावरील सहकार्य घेण्यात येणार आहे.

केंब्रिजकडे जागतिक दर्जाचे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम, पाठ्यपुस्तके, डिजिटल सामग्री व नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती उपलब्ध आहेत. या सामंजस्य कराराअंतर्गत केंब्रिज शिक्षकांसाठी विषयानुरूप प्रशिक्षण कार्यक्रम, राष्ट्रीय शिक्षण धोरणास अनुरूप आणि सीबीएसई-सुसंगत शैक्षणिक साधनसामग्री, आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्रे तसेच विद्यार्थ्यांसाठी ‘क्लायमेट क्वेस्ट’ सारखा हवामान शिक्षण कार्यक्रम व पूर्व-प्राथमिक अभ्यासक्रम उपलब्ध करून देणार आहे. याशिवाय डिजिटल साक्षरता, आयसीटी आधारित शिक्षण, जीवनकौशल्ये व मूल्यशिक्षणाशी संबधित अभ्यासक्रमही राज्यातील शाळामध्ये राबवले जातील.

या करारामुळे शिक्षकांच्या गुणवत्तेत वाढ होऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक परिणामामध्ये सुधारणा होईल. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पद्धतीचा लाभ ग्रामीण ते शहरी सर्व शाळांना मिळेल, हवामान शिक्षण व डिजिटल कौशल्यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांना सज्ज करता येईल. यामुळे राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होईल आणि महाराष्ट्राची शिक्षणव्यवस्था अधिक समावेशक, गुणवत्तापूर्ण व जागतिक मानकाशी अनुरूप बनेल. राज्यातील शिक्षकांना केंब्रिज प्रेस आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिक्षक विकास कार्यक्रम, सेल्टा व आयकेआय सारख्या जागतिक मान्यताप्राप्त पात्रता तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी सुसंगत के-१२ शैक्षणिक साधने उपलब्ध करून शिक्षक क्षमता वृद्धी, दर्जेदार अध्यापन आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल. तसेच या कराराद्वारे महाराष्ट्र शासनाला राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करता येईल. शिक्षक व विद्यार्थी दोघांनाही जागतिक दर्जाचे संसाधन उपलब्ध होतील. शिक्षण प्रणालीत नवोन्मेष व गुणवत्ता येईल आणि राज्याच्या शिक्षणव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय मान्यता प्राप्त होईल. हा करार महाराष्ट्रातील शाळांना ‘भविष्यकालीन, समावेशक व गुणवत्तापूर्ण शिक्षण’ देण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरेल.

## संपादकीय....

### सुसंस्कृत राजकारण

एकेकाळी सुसंकृत राजकारणासाठी ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची अधोगती आता यूपी-बिहारच्या दिशेने नव्हे तर त्याच्याही खाली होत असल्याचं चित्र आहे. राजकारणात बोलताना शब्द जपून वापरावेत, विरोधकांवर टीका करताना किमान अपशब्द वापरू नयेत हा नियम म्हणजे इतिहास झाला आहे. आता उठता-बसता एकम`कांना शिव्या दिल्याशिवाय राजकीय नेत्यांच्या दिवसाची सुरुवात होत नसल्याचं दिसतंय. नुकतंच भाजपचे आमदार गोपीचंद पडळकरांनी त्याची निचांकी पातळी गाठली. जयंत पाटलांवर टीका करताना थेट त्यांच्या वडिलांवर घसरले आणि गावातील पारावर शिव्या देतात तसे शब्द वापरले. जयंत पाटील हे राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव असलेले नेते. राज्यातील विविध खात्यांचे मंत्रिपद सांभाळताना त्यांनी आपल्या कामाची छाप पाडली. सांगलीतील राजकारणावरही त्यांचे एकेकाळी वर्चस्व. गेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र जयंत पाटलांच्या वर्चस्वाला हादरा बसला. त्याचवेळी भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर आणि त्यांचा वाद मात्र वाढला. तो इतका वाढला की, गोपीचंद पडळकरांनी पातळी सोडून त्यांच्यावर टीका केली. जयंत पाटील हा बिनडोक माणूस, त्याला काही अक्कल नाही अशा शेलक्या शब्दात पडळकरांनी जयंत पाटलांचा समाचार घेतला. मात्र पुढे बोलताना मात्र त्यांनी पातळी सोडली. जयंत पाटील हे राजारामबापू पाटील यांची औलाद आहेत असं वाटत नाही असं पडळकर म्हणाले. पडळकरांनी नुकतंच केलेलं वक्तव्य हे पहिलंच नाही, तर या आधीही शिवराळ भाषेच्या नावाखाली त्यांनी पवार कुटुंबीयांवर बोलताना अपशब्द वापरल्याचं दिसतंय. आमदार असतानाही त्यांच्या या कार्यात खंड पडला नाही हे विशेष.

## जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद नागरिकांना सोमवार व शुक्रवार भेटणार



सोलापूर/जिमाका : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे आठवड्यातून दोन दिवस नागरिकांना भेटण्यासाठी वेळ देत आहेत. दर सोमवार व शुक्रवार दुपारी ४.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत ते जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या अडीअडचणी ऐकून घेतील.

जिल्ह्यातील काही नागरिकांना या वेळांबाबत माहिती नसल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या वतीने कळविण्यात येते की, सर्वसामान्य नागरिकांनी आपल्या कामकाजासाठी दिलेल्या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात उपस्थित राहावे.

# घटस्थापना व नवरात्रोत्सव : श्रद्धेचा दीप आणि स्त्रीशक्तीचा जागर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारताचा प्रत्येक सण हा केवळ आनंदाचा क्षण नसतो, तर तो आपल्याला जीवन जगण्याची नवी दिशा देतो. नवरात्रोत्सव हा त्यापैकीच एक महत्त्वाचा उत्सव. आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून घटस्थापनेने या उत्सवाची सुरुवात होते. त्या क्षणी प्रत्येक घरात, प्रत्येक अंतःकरणात एक नवी उर्जा, एक नवा प्रकाश जागतो. घटस्थापना हा हिंदू धर्मातील एक विधी आहे. आश्विन शुद्ध प्रतिपदा या तिथीला स्वरूप घडा किंवा कलश याच्या ठिकाणी देवीची स्थापना केली जाते आणि याचे नऊ दिवस पूजन केले जाते. ताटात गंगाजलाने भरलेला कलश ठेवून आणि त्यात नाणी, सुपारी आणि कच्चा तांदूळ आणि हळद पावडर पासून तयार केलेले अक्षत भरतात. त्यावर आंब्याची पाच पाने आणि एक नारळ घालतात. शेवटी माँ शैलपुत्री आणि माँ दुर्गा यांची पूजा करतात आणि तेलाचा दिवा, अगरबत्ती, फुले, फळे, मिठाई आणि देशी तुपाचा विशेष भोग लावतात. तसेच आश्विन महिन्यात घटामध्ये देवीची स्थापना करून, नंदादीप प्रज्वलित करून आदिमायेची नऊ दिवस मनोभावे पूजा करणे, म्हणजेच घटस्थापना किंवा नवरात्रोत्सव. घटस्थापना दरम्यान लोक कलशात पवित्र पाणी भरतात. त्यानंतर कलशावर शेणाचा लेप केला जातो आणि त्यात बार्लीच्या बिया पेरल्या जातात. नंतर ते वाळूच्या खड्ड्यात ठेवले जाते. कलश हिंदू विधींमध्ये खोल प्रतीकात्मकता धारण करतो, विपुलता, समृद्धी आणि आध्यात्मिक शुद्धतेचे प्रतिनिधित्व करतो. हे पवित्र गंगा नदीच्या पाण्याने भरलेले आहे, जे जीवन टिकवून ठेवणाऱ्या दैवी उर्जेचे प्रतीक आहे. कलश हे दैवी पात्र म्हणून पूजनीय आहे आणि समारंभांमध्ये तांदळाच्या पलंगावर ठेवले जाते.

जेव्हा आपण मातीत बी पेरतो, तेव्हा ती छोटीशी हिरवी कोंब दिसण्यासाठी आपल्या डोळ्यांत किती प्रेम असतं! घटस्थापनेतले हे धान्य फक्त अन्नधान्याचे प्रतीक नसते, तर जीवनातील नव्या उमेदिचे, नव्या स्वप्नांचे आणि नव्या विश्वासाचे प्रतीक असते. कलशातील पाणी आपल्याला सांगते जीवन सतत वाहतं, अडथळे आले तरी थांबत नाही. आणि नारळ आपल्याला आठवण करून देतो कणखर आवरणातही गोडवा दडलेला असतो. नवरात्रीत आपण देवीच्या नऊ रूपांची पूजा करतो. परंतु ती देवी केवळ आकाशातील एखादी मूर्ती नसते, ती आपल्याजवळच असते-आपली आई, बहीण, पत्नी, मुलगी, शिक्षिका, कामगार स्त्री. तिच्या त्यागातून, तिच्या कष्टातून आणि तिच्या प्रेमातूनच खऱ्या शक्तीचा उगम होतो. घटस्थापना आपल्याला शिकवते की ज्या हातांनी संसार उभा राहतो, ज्या हृदयाने संसार सांभाळला जातो, त्याच हातांना, त्याच हृदयाला आपण वंदन करायला हवे.

नवरात्रीच्या रात्री गावोगावी होणारे जागर, भजनी मंडळींचे सूर, दांडिया-गरब्याची तालबद्ध पावलं-हे सगळं एकच सांगतं, की माणूस एकटा आनंद शोधू शकत नाही. आनंद तेव्हाच खरा जेव्हा तो सामायिक केला जातो. देवीसमोर बसून केलेली सामूहिक आरती, सगळ्यांच्या डोळ्यांत चमकणारी श्रद्धा-हीच खरी एकात्मतेची मूर्ती आहे. आज समाजात तणाव, भेदभाव, हिंसा वाढत चालली आहे. अशावेळी घटस्थापनेतून मिळणारा संदेश अधिक महत्त्वाचा ठरतो जसे धान्य मातीमध्ये पेरले की अंकुर फुटतो, तसेच प्रेम पेरले तर समाजात सौहार्द अंकुरतो. नवरात्रोत्सवाने आपण केवळ देवीची पूजा न करता, प्रत्येक स्त्रीला सन्मान द्यावा, प्रत्येक दुर्बलाला आधार द्यावा, हेच या सणाचे खरे पालन आहे.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

नवरात्रीचे उत्सव संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळे असतात आणि विशिष्ट संस्कार क्षेत्रांमध्ये भिन्न असतात, जरी त्यांना समान म्हटले जाते आणि एकाच देवतेला समर्पित केले जाते. सर्वात सामान्य उत्सव नवरात्रीच्या पहिल्या दिवशी घटस्थापनेने सुरू होतो, ज्याचा शाब्दिक अर्थ भांडगे चढवणे असा होतो. घटस्थापना पूजेचे महत्त्व आणि महत्त्व हे जीवनाच्या सर्व क्षेत्रात देवीचे सामर्थ्य प्राप्त करण्याचा प्रयत्न करते. या व्यतिरिक्त हा चांगला आणि वाईट यांच्यातील लढाईच्या प्रारंभाचा उत्सव आहे. संपूर्ण सणात कलशाची पूजा केली जाते त्यानंतर दहाव्या दिवशी किंवा विजयादशमीला कलश विसर्जन केले जाते.

महाराष्ट्रात नवरात्रीची ही पोकळी भरून काढण्यासाठी, प्रबोधनकार, बोले आणि इतरांनी नवरात्र हा जनसामान्यांचा उत्सव म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली, प्रबोधनकारांनी शिवाजी महाराजांनी पूजलेल्या तुळजापूरच्या भवानीला महाराष्ट्राचे प्रमुख दैवत म्हणून धारण केले. हिंदूंना जातीपातीच्या ओलांडून एकत्र आणण्याची कल्पना होती. त्यांच्या चरित्रात, प्रबोधनकार असा दावा करतात की, शिवाजी महाराजांच्या काळात जरी नवरात्र साजरी केली जात असली तरी पुण्यातील ब्राह्मण पेशव्यांच्या काळात गणेशपूजेला प्राधान्य मिळाले. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी नंतर सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून गणेश उपासना परंपरेचे पुनरुज्जीवन केले. महाराष्ट्रातील यवतमाळ जिल्हा हा नवरात्रोत्सवासाठी प्रसिद्ध आहे. उत्सवादरम्यान शहर दिव्यांनी सजवले जाते आणि अनेक सांस्कृतिक कार्यक्रम होतात.

नवरात्र हे साधारणपणे नऊ दिवसांचे असते पण तिथीचा क्षय झाल्याने ती आठ दिवसांची किंवा वृद्धी झाल्यास दहा दिवसांची असू शकते. चंपाषष्ठीची म्हणजे खंडोबाची नवरात्र फक्त सहा दिवसांचे असते. सर्व देवांच्या ठिकाणी असलेल्या शक्तींचे दैवतीकरण होऊन त्या शक्तिरूप मूर्तीला देवी असे नाव मिळाले आणि शाक्त संप्रदायी लोकांनी तिला सर्वश्रेष्ठ देवता, आदिमाया किंवा जगदंबा म्हणून गौरविले. देवीची उग्र व सौम्य अशी दोन रूपे पहायला मिळतात. उमा, गौरी, पार्वती, जगदंबा, भवानी ही देवीच्या सौम्य रूपांची नावे असून दुर्गा, काली, चंडी, भैरवी, चामुंडा ही देवीची उग्र रूपे आहेत. शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडी, कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी आणि सिद्धिदात्री अशी ही देवीची नऊ रूपे आहेत. मार्कंडेय पुराणातील देवी माहात्म्यात सांगितले आहे शरद ऋतूतील वार्षिक महापूजेत देवीमाहात्म्य भक्तिपूर्वक ऐकल्यास सर्व बंधनांपासून व्यक्ती मुक्त होते आणि धनधान्याने परिपूर्ण होते.



नवरात्र हा ऋतू परिवर्तनाचा काल असतो. यामुळे आपल्या नवीन शक्ती, नवा उत्साह, उमेद निर्माण होत असते. बृहत संहितेनुसार सूर्य तसेच इतर ग्रहांमध्ये होणाऱ्या परिवर्तनाचा प्रभाव मनुष्याच्या आरोग्यावर आणि व्यवहारांवर होत असतो. सृष्टीतील परिवर्तन हा शक्तीचाच खेळ आहे. ब्रह्मचर्य, संयम, उपासना, यज्ञ केल्याने शरीरात रोगप्रतिकारक शक्ती वाढते. स्मरणशक्ती चांगली होऊन बौद्धिक विकास होतो. म्हणून नवरात्र हा शारीरिक व आत्मिक शुद्धतेचा काळ आहे असे मानले जाते. गुजरातमध्ये नवरात्री उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. दांडिया किंवा दांडिया रास हे गुजरातमधील लोकनृत्य आहे. हे समूहनृत्य विशेष करून नवरात्रात नाचले जाते. गुजरातमध्ये कोणत्याही सणाला किंवा शुभप्रसंगी हे नृत्य करण्याची परंपरा आहे. गरबा हा गुजरातमधील नवरात्री उत्सवातील पारंपरिक नृत्याचा प्रकार आहे. एका रंगीत घड्याला छिद्रे पाडून त्यात दिवा लावला जातो आणि त्याची पूजा केली जाते. या घड्याला गरबो असे म्हणतात.

गरबा खेळणे म्हणजे टाळयांच्या किंवा बहुधा लाकडी दांड्यांच्या लयबद्ध गजरामध्ये देवीची भक्तिरसपूर्ण गाणी म्हणणे. गरब्याच्या वेळी गोलाकार फेर धरून केलेले मंडल हे घटाचे प्रतीक असते, यांच्या मध्यभागी छिद्र असलेल्या रंगीबेरंगी मातीच्या घड्यात दिवे लावले जातात आणि त्याभोवती गोलाकार नाचण्याची पद्धत आहे. नवरात्र साधारणपणे देवीचे असते, पण इतर देवांची नवरात्रेही असतात. तुळजाभवानीचे नवरात्र दहा दिवसांचे असते, तशीच खंडोबाचे, व्यंकटेशाचे, नरसिंहाचे, दत्ताचे अशी इतरही नवरात्रे असतात. यापैकी नरसिंहाचे नवरात्र तीन ते नऊ दिवस, खंडोबाचे पाच किंवा सहा दिवस, बालाजी (व्यंकटेशाचे) दहा दिवस, दत्ताचे नऊ ते दहा दिवस असते. आश्विन शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होणाऱ्या नवरात्रीं खेरीज, आश्विन शुक्ल तृतीयेपासून सुरू होणारा सप्तरात्रोत्सव, पंचमीपासून सुरू होणारा पंचरात्रोत्सव आणि सप्तमीपासून सुरू होणारा त्रिरात्रोत्सव ही कमी-अधिक दिवसांची नवरात्रे असतात.

नवरात्री दरम्यान विशिष्ट रंग परिधान करणे शुभ मानले जाते, कारण प्रत्येक दिवसाचा एक वेगळा दुवा आणि महत्त्वपूर्ण आध्यात्मिक अर्थ आहे. नवरात्रीचा पहिला रंग हा उत्सव सुरू होणाऱ्या आठवड्याच्या दिवसानुसार निवडला जातो आणि उरलेले आठ दिवस पूर्वनिश्चित चक्रानुसार रंगवले जातात. नवरात्रीचे नऊ रंग पिवळे, हिरवे, राखाडी, केशरी, पांढरे, लाल, रॉयल ब्लू, गुलाबी आणि जांभळे आहेत. या रंगांचा उपयोग उत्सवादरम्यान पूजा केल्या जाणाऱ्या प्रत्येक देवींचे चित्रण करण्यासाठी केला जातो. सोमवार: पांढरा – स्वतःला पांढरी फुले आणि इतर वस्तूंनी वेढून घ्या. मंगळवार: लाल – तुमच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडण्यासाठी आव्हाने स्वीकारा. बुधवार: तुमची प्रलंबित कामे अभ्यासण्यासाठी आणि पूर्ण करण्यासाठी हिरवा दिवस चांगला आहे. गुरुवार: पिवळा – शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाठपुरावा करण्यासाठी उत्कृष्ट दिवस.

घटस्थापना ही फक्त एका कलशाची स्थापना नाही, तर ती आपल्या अंतःकरणात श्रद्धेचा दीप प्रज्वलित करण्याची प्रक्रिया आहे. नवरात्रोत्सव हा फक्त नऊ दिवसांचा उत्सव नाही, तो जीवनभर जपण्याजोगा संस्कार आहे. शक्तीची उपासना करून जर आपण स्त्रीला खरा मान, समाजाला खरी एकात्मता आणि निसर्गाला खरी जपणूक दिली, तर हाच उत्सव आपल्या जीवनाला खरं यश देईल. घटस्थापना आणि शारदीय नवरात्री तुमच्या आयुष्यात सुख, समृद्धी, शांती घेवून येवो, हीच सदिच्छा व घटस्थापना व नवरात्रोत्सव मंगल पर्वाच्या हार्दिक शुभेच्छा !

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचा सुपतगाव शाळेत जल्लोष

**हुतात्म्यांना अभिवादन**

उमरगा/प्रतिनिधी : हुतात्म्यांच्या रक्तशिंपणातून उमललेल्या स्वातंत्र्यफुलांना वंदन करीत, बलिदान व शौर्याच्या सुवर्ण अक्षरांनी उजळलेल्या मराठवाडा भूमीत स्वाभिमानाचा दीप उजळत ठेवण्याचा संकल्प जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुपतगांव ता. उमरगा येथे व्यक्त करण्यात आला.

**स्वातंत्र्याचा सोहळा – ध्वजारोहणाने प्रारंभ**

बुधवार दि. १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त सकाळच्या मंगल वातावरणात शाळेच्या प्रांगणात राष्ट्रगीताच्या स्वरांनी आसमंत दुमदुमला. शाळेचे मुख्याध्यापक व्यंकट क्षीरसागर यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकला. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून शूरवीरांना अभिवादन करण्यात आले.




या कार्यक्रमात शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय गिरी, सुरेश लामजणे,ज्ञानेश्वर गुरव,सुधाकर हेंडले,रतन लामजणे,नवनाथ शिंदे, आप्पाराव मुळे ,ग्रामपंचायत अधिकारी सुनील पांचाळ, तंटामुक्ती अध्यक्ष सोमनाथ लामजणे, ग्राप सदस्य रवी करके,पोलीस पाटील महादेव कुंभार,राजेंद्र करके,प्रताप लामजने, संध्याराणी लामजणे, संभूलिंग बिराजदार यांच्यासह ग्रामस्थ, पालक प्रतिनिधी तसेच विविध मान्यवर उपस्थित होते.

**इतिहासाचे प्रबोधन – विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन**

शाळेतील शिक्षिका कुलकर्णी यांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास, हुतात्म्यांचे त्याग आणि बलिदान विद्यार्थ्यांना समजावून सांगत देशभक्तीची ज्योत विद्यार्थ्यांच्या अंत:करणात पेटवली.

या मुक्ती संग्राम दिनाचे औचित साधून शाळेत सामान्यज्ञान परीक्षा घेण्यात आली होती, यात प्रथम क्रमांक कृष्णा भालेराव, द्वितीय क्रमांक श्रीयश गुरव, तृतीय श्रीयश लामजणे, या गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

या मुक्ती संग्राम दिनानिमित्त काही विद्यार्थ्यांनी भाषणे केली तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे मनमोहक सूत्रसंचालन राजेश सूर्यवंशी , चिदानंद स्वामी यांनी केले.आभार शिक्षिका पावशेरे यांनी मानले. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापक श्री व्यंकट क्षीरसागर, सहशिक्षिका कुलकर्णी, पावशेरे , शाळा सहाय्यक आदीनी मन:पूर्वक परिश्रम घेतले.

# गोरठान येथील ३ महिन्यांचा रस्त्यावरील वाद अखेर मिटला!

निफाड तालुक्यात महसुल रस्ता अदालत ठरली 'समजुतीचा मार्ग'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस ७ सप्टेंबर ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीत देशभर राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवड्या अंतर्गत निफाड तालुक्यात आज महसुल रस्ता अदालत भरली. या अदालतीत तीन महिन्यांपासून प्रलंबित असलेला गोरठाण येथील रस्त्याचा वाद अखेर समजुतीने मिटला.




गोरठाण येथील काशिनाथ बाजीराव ढोमसे विरुद्ध सुभाष कचरु केदारे या प्रकरणात शेतरस्त्याचा वाद सुटत नसल्याने ग्रामस्थ त्रस्त होते. आज तहसिल कार्यालयात झालेल्या सुनावणीत दोन्ही बाजूंनी समझोता केल्याने गावकऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला.

या महसुल अदालतीत एकूण ३१ प्रकरणांचा समावेश करण्यात आला होता. त्यातील गोरठाण प्रकरणाचा निकाल विशेष गाजला. शेतरस्त्यांवरील प्रलंबित वादांना गती देऊन विकासाचा मार्ग मोकळा करण्यासाठी हा प्रयत्न फलदायी ठरल्याचे प्रशासनाने सांगितले.

या अदालतीस तहसिलदार विशाल नाईकवाडे अध्यक्षस्थानी होते. त्यांना ड. प्रविण ठाकरे अध्यक्ष, निफाड वकील बार ड. जंगम, ड. देशमुख, ड. लोंढे, ड. कुलकर्णी यांसह अनेक विधिज्ञ उपस्थित होते. याशिवाय नायब तहसिलदार राजेंद्र वराडे, सहा. महसुल अधिकारी मारुती ठाकरे, दत्तात्रय सोनवणे, अकीलाबानो तडवी, महसुल सहाय्यक ललित खैरे, प्रशांत पवार, . हर्षदा भोये, शरद घाटगे आदी उपस्थित होते.

**मसाला उद्योगासाठी पल्वलायझर मशीन व ग्राइंडर मशीन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून महिलांसाठी उपलब्ध करून देणार : सरपंच सागर पाटील**

# मसाला उद्योग लासुर्णे गावाचा ग्राम उद्योग व्हावा : सरपंच सागर पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : लासुर्णे गावामध्ये जागतिक लोकशाही दिनाचे निमित्त साधुन लासुर्णे ग्रामपंचायत व साद फाउंडेशन, इंदापूर चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दिनांक १५ सप्टेंबर २०२५ ते १७ सप्टेंबर २०२५ रोजी तीन दिवसीय ग्रामस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना लासुर्णे गावचे सरपंच सागर पाटील यांनी सांगितले की, मसाला उद्योग हा महिलांचा आर्थिक स्थिती मजबूत करणारा व्यवसाय आहे. त्यामुळे मसाला निर्मिती उद्योग हा लासुर्णे गावाचा ग्राम उद्योग व्हावा. यासाठी लागणाऱ्या पल्वलायझर मशीन व ग्राइंडर मशीन ग्रामपंचायतीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातील.

यावेळी लासुर्णे ग्रामपंचायतीचे ग्राम सेवक स्वप्नील गायकवाड, ग्रामपंचायत सदस्या सौ. मनीषा अनिल पाटील, ग्रामपंचायत सदस्य संतोष (पिपा) लोंढे, ग्रामपंचायत सदस्या सौ. सोनम दिपक लोंढे, अनिल पाटील, दिपक लोंढे, विठ्ठल पाटील, महादेव रूपनवर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे तालुका सरचिटणीस क्षितीज वनसाळे, महेश रूपनवर उपस्थित होते.

तीन दिवस चाललेल्या या शिबिराला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शिबीराच्या ठिकाणी महिलांकडून कच्च्या मसाल्यांपासुन वेगवेगळ्या प्रकारचे तयार मसाले कसे बनवायचे यांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून घेतले. लागणाऱ्या मशनरी, मार्केटिंग, शासकीय योजना यांची माहिती व या व्यवसायाच्या निगडित सर्व माहिती महिलांना या शिबिरात देण्यात आली.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी साद फाऊंडेशन चे अध्यक्ष सुरज वनसाळे, संस्थेच्या प्रशिक्षण संचालक भाग्यश्री ठाकुरदास व आशा निमसे, संस्थेचे आप्पासो कदम, कोमल वनसाळे, हर्षल वाघमारे, वैभव निंबाळकर यांनी प्रयत्न केले.




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सोलापूर जिल्ह्यात मार्केटिंगसाठी पुढे या : आ. सुभाष बापू देशमुख

## २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर जिल्हा पर्यटन महोत्सव साजरा होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्यात सोशल फाउंडेशन मार्फत सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे. जिल्ह्यातील उत्पादने, वृक्ष लागवड, कलाकार खेळाडू, अधिकारी व रोजगार निर्मिती, प्रदूषण मुक्त वातावरण म्हणून सोलापूर जिल्हा किती सुजलाम सुफलाम आहे. हे दाखवण्यासाठी २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर जिल्हा पर्यटन महोत्सव म्हणून साजरा करण्यात येणार आहे. सोलापूर सोशल फाउंडेशन च्या माध्यमातून साकारण्यात येणाऱ्या उपक्रमाचा धागा होऊन या उपक्रमाची लोक चळवळ बनावे असा आपला माणूस आहे. सोलापूर सोशल फाउंडेशन ही बिगर राजकीय संस्था असून. सोलापूर जिल्ह्याची मार्केटिंग कसे करण्यात येईल याकडे सोलापूर फाउंडेशन डोळसपणे पाहत आहे. असेही यावेळी त्यांनी सांगितले.

२७ सप्टेंबर रोजी जागतिक पर्यटन दिन म्हणून साजरा होत आहे. सोलापूर जिल्हा हा अध्यात्मिक साहित्यिक, समृद्धता व सांस्कृतिक, यामुळे अगदी समृद्ध जिल्हा आहे परंतु व तंत्रज्ञाचा व शहरीकरणाचा झपाट्याने माणूस हा मूळ गावापासून संस्कृतीपासून व .माणुसकीच्या मातीपासून दुरावला आहे स्वतःचा उद्योग स्थापन करण्यासाठी आत्मसात केल्यास सोलापूर जिल्हा मोठा श्रीराम होईल असे उद्गार माजी मंत्री सुभाष बापू देशमुख यांनी काढले.

या संदर्भात देणे पंढरपूर येथील याची खाजगी हॉटेलमध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. पत्रकारांसाठी

**सोलापूर जिल्ह्यातील लोकमंगल समूहाचे सर्वेसर्वा सोलापूर सोशल फाउंडेशन च्या वतीने आपणास काय साध्य करावयाचे आहे. त्यांनी सांगितले. लोकमंगल समूहाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लोकमंगल बँक, सोलापूर जिल्ह्यामध्ये लोकमंगल पतसंस्थेच्या माध्यमातून ३५ शाखा सुस्थितीत चालू आहेत. व सोलापूर जिल्ह्यामध्ये लोकमंगल समूहाच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रम सोलापूर जल्ह्यामध्ये कार्यक्रम घेतले जातात.**

**सोलापूर सोशल फाउंडेशन ची निर्मिती करण्यात आली आहे सोलापूर सोशल फाउंडेशन हे एक काम लोक चळवळ बंदी आहे. या कामाची दखल संपूर्ण महाराष्ट्राने घेतली जावी असे काम करणार असल्याचे सांगितले.**




संवाद साधला सोलापूर जिल्ह्यात सोशल फाउंडेशन च्या वतीने गावांपेक्षा अधिक गावांना वैभव प्राप्त करून देण्यात आले आहे. आता संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात धार्मिक पर्यटन स्थळे व औद्योगिक, इथे उभारता येणार आहेत. अनेक उद्योग उभारता येणार आहेत सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून सोलापूर जिल्हा हा सुजलाम सुफलाम करण्याचा मानस आहे. सोलापूर जिल्हा हा पर्यटन महोत्सव म्हणून वाढवण्याचा प्रयत्न करावा असेही आवाहन केले आहे.

यावेळी शेलार कॉम्प्लेक्स चे प्रोप्रायटर विजय शेलार, मोहन अनपट, उद्योगपती अजित कंडरे, अनंत ( दादा) चव्हाण आधी जण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# निफाड नगरपंचायतच्या वतीने स्वच्छता ही सेवा निमित्त विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : गृहनिर्माण तथा शहरी कार्य मंत्रालय भारत सरकार यांचे पत्रान्वये १७ सप्टेंबर २०२५ ते दि. २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान स्वच्छता ही सेवा हे अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून या अभियाना अंतर्गत स्वच्छता ही सेवा या पंधरवड्यात एक दिवस, एक तास, एक साथ, स्वच्छता मोहीम घोषित केली असून सदर अभियानात नगरपंचायतने शहरात विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम, प्लास्टिक प्रदूषण कमी करणे कामी जनजागृती मोहीम तसेच घर ते घर स्वच्छतेबाबत जनजागृती करणे सफाई, कर्मचारी यांचे आरोग्य शिबिर, वृक्ष लागवड, संगोपन व संवर्धन करणे याबाबत जनजागृती करण्यासाठी शाळा महाविद्यालयात चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, पथनाट्य प्रभात फेरी काढणे, सायकल रॅली आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे दिनांक १८ सप्टेंबर २०२५ रोजी निफाड नगरपंचायतीचेमार्फत शांतीनगर चौफुली ते छत्रपती संभाजी नगर रोड या ठिकाणी नुकतीच स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

यावेळी अधिकारी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते निफाड नगरपंचायत चे मुख्याधिकारी धीरज भामरे यांनी आपल्या सभोतालचा परिसर स्वच्छ ठेव आपले निफाड शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यास सहकार्य करावे असे नागरिकांना आवाहन केले आहे

# कोठुरे विद्यालयास वीर बॅक निमल हेल्थ प्रा. लि. तर्फे बेंच भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संचलित स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालयास कोठुरे येथिल पशुधन अधिकारी डॉ.रवींद्र चांदोरे यांच्या प्रयत्नातून ५० बेंच मिळाले.असुन यासाठी मुंबई स्थित वीर बॅक निमल हेल्थ प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीच्या सीएसआर फंडातून विद्यालयास सदर मदत मिळाली. कंपनीकडून नाशिक जिल्ह्यातील फक्त दोनच शाळा निवडण्यात आल्या त्यापैकी स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे या शाळेची निवड झाली .ही मदत मिळविण्यासाठी डॉक्टर रवींद्र चांदोरे यांनी कंपनीचे मॅनेजर श्री ज्ञानेश्वर बोरसे यांच्याशी सतत संपर्क साधून विद्यालयातील भौतिक सुविधेसाठी मदत उपलब्ध करून दिली . त्याबद्दल डॉ. रवींद्र चांदोरे, वीर बॅक कंपनी व त्यांचे मॅनेजर बोरसे यांचे मराठा विद्या प्रसारक समाज नाशिक , स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे मुख्याध्यापक सुनील सातपुते शालेय स्कूल कमिटी अध्यक्ष सदस्य व सभासद यांनी त्यांचे विशेष आभार मानले व सहकार्याबद्दल अभिनंदन व्यक्त केले.

# प्रशांतराव परिचारक यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने साठ हजार वह्यांचे वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर जिल्ह्याचे माजी विधानपरिषद आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या साठाव्या वाढदिवसाच्या औचित्याने पंढरपूर नगरपरिषदेचे माजी नगरसेवक गणेशभाऊ अधटराव व नवशक्ती सामाजिक संघटना सह्याद्री नगर इसबावी यांच्या वतीने पंढरपूर शहरातील सर्व शाळांमधिल शालेय विद्यार्थ्यांसाठी साठ हजार वह्यांचे वाटप करण्यात आले. प्रशांतराव परिचारक यांच्या सामाजिक उपक्रमांवर भर देण्याच्या आव्हानाला प्रतिसाद देत प्रतिवर्षी गणेशभाऊ अधटराव हे परिचारक यांच्या वाढदिवसानिमित्त विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवत असल्याचे या अगोदरही दिसून आले आहे त्यांनी या अगोदरही नवशक्ती सामाजिक संघटनेच्या माध्यमातून परिचारक यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने वृक्षारोपण...आरोग्य व रक्तदान शिबिर असेल गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप महिलांसाठीचे गृहउपयोगी वस्तुंच्या वाटप कार्यक्रमाचे आयोजन असे आधी विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत स्वतः प्रशांतराव परिचारक यांनी त्यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांच्या हितचिंतकांनी वायफळ खर्च न करता समाज हितोपयोगी कार्य करण्याचे आवाहन त्यांनी त्यांच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना केले होते त्या पार्श्वभूमीवर गणेशभाऊ अधटराव यांच्या वतीने साठ हजार वह्यांचे वाटप पंढरपूर शहरातील सर्व शाळांमध्ये करण्यात आले.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोटतर्फे समर्थ नगर ग्रामपंचायत येथे ग्राम स्वच्छता अभियान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट तर्फे आज दिनांक १७ सप्टेंबर २०२५ रोजी समर्थ नगर ग्रामपंचायत तालुका अक्कलकोट येथे सकाळी ठीक दहा वाजता ग्राम स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करून कार्यान्वित करण्यात आला. सकाळी ठीक दहा वाजता सुमंगल मंगल कार्यालय येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या शुभारंभासाठी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले प्रारंभी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करून महात्मा गांधींची यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करून ग्रामसभेत सुरुवात करण्यात आली सदर अभियानाची सविस्तर माहिती सभेत देण्यात आली त्यानंतर महसूल विभागाकडून सर्व विषयांची माहिती सभेत देण्यात आली स्वच्छता ही सेवा या कार्यक्रमाबाबत सभेत सविस्तर माहिती देऊन सदर उपक्रम १७ सप्टेंबर रोजी स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्धार करण्यात आले सदर स्वच्छता अभियानाची सुरुवात ग्रामपंचायत ऑफिस समोर आदिशक्ती देवी मंदिर परिसरापासून करण्यात आली सदर स्वच्छता अभियानामध्ये शासकीय आयटीआय चे विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षक ग्रामस्थ व कर्मचारी यांनी मिळून स्वच्छतेसाठी श्रमदान करण्यात आले याप्रसंगी समर्थ नगर ग्रामपंचायतचे माजी सरपंच माननीय श्री प्रदीप पाटील साहेब खजुर्गीकर सर माजी उपसरपंच लाला राठोड साहेब माजी ग्रामपंचायत सदस्य अरुण विलास राठोड मुनेश्वर नरेकर तसेच एमजेपीचे उप अभियंता सुनील देशपांडे साहेब शाखा अभियंता मतीन बागवान साहेब ग्राम महसूल अधिकारी सुहास डोईफोडे ग्राम पंचायत अधिकारी दयानंद खोबण साहेब उपस्थित होते सदर स्वच्छता




अभियानाकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे आयएमसी चेअरमन माननीय राज शेखर हिप्परगी साहेब व प्रभारी प्राचार्य श्री काशीद सर ज्येष्ठ निदेशक श्री नदाफ सर संस्थेतील श्रीमंठाळे सर श्री कोणापुरे सर श्री बिराजदार सर श्री घोडके सर सौ गवल मॅडम श्री वाघमोडे सर श्री लंबे सर श्री बंगाळे सर श्री स्वामी सर त्यांचा सहभाग होता सदर उपक्रम करिता आयटीआय चे विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना नुतनीकरणासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करण्याचे आवाहन

सोलापूर/जिमाका : महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तथा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत असून त्यासाठी https://hmas.mahait.org या पोर्टल द्वारे अर्ज स्विकारण्यात येत असल्याचे सहायक आयुक्त, समाज कल्याण यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षासाठी सोलापूर शहरातील व तालुक्याच्या ठिकाणातील महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात स्वाधार योजनेसाठी अर्ज केले होते अशा विद्यार्थ्यांनी आपला नुतनीकरण (ठशपशुरश्र) अर्ज https://hmas.mahait.org या पोर्टलवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी सन २०२५-२६ करिता नुतनीकरण (ठशपशुरश्र) ऑनलाईन अर्ज लवकरात लवकर सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

**निफाड येथे चार दिवसीय शारदीय व्याख्यानमाला सुरू**

**युवराज पाटील यांचे प्रतिपादन**

# उद्याची आदर्श पिढी घडवायची असेल आई-वडिलांनी मुलांना मायेची ऊब द्यावी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : उद्याची आदर्श पिढी घडवायची असेल तर आई-वडिलांनी मुलांवर संस्कार करून प्रेमाची , मायेची ऊब द्यायला हवी असे प्रतिपादन लेखक युवराज पाटील यांनीं केले.

निफाड येथील शारदीय व्याख्यानमाला समितीच्या वतीने नवरात्र पूर्वसंध्येला चार दिवसीय शारदीय व्याख्यानमालेचे निफाड येथील रविराज मंगल कार्यालय येथे आयोजन करण्यात आले असून या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प ,संस्काराचे विद्यापीठ - कुटुंब या विषयावर गुंफतांना त्यांनी वरील प्रतिपादन केले दरवर्षी नवरात्रामध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या या शारदीय व्याख्यानमालेचे हे १३ वे वर्ष होय.

या व्याख्यानमालेचे उदघाटन निफाडचे प्रांत डॉ शशिकांत मंगरूळे यांनी दीपप्रज्वलन करून केले याप्रसंगी व्यासपीठावर, प्रांत डॉ शशिकांत मंगरूळे, शारदीय व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष रतन पाटील वडघुले, या व्याख्यानमालेच्या पहिले पुष्पाचे प्रायोजक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वि .दा. व्यवहारे ,वैनतेय विद्यालयाचे पर्यवेक्षक गुलाब टकले व सौ मंदाकिनी टकले आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वि. दा.व्यवहारे यांनी केले आपल्या व्याख्यानात युवराज पाटील पुढे म्हणाले की एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये घरातील कुटुंबप्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली संस्कार नातीगोती टिकून होती परंतु विभक्त कुटुंब पद्धती वाढल्याने एकमेकाला समजून घेण्याचं प्रमाण कमी झाले असून घटस्फोटाचे सर्वात जास्त प्रमाणात विभक्त कुटुंब पद्धतीत आढळते विशेष म्हणजे लग्नानंतर एकमेकाला समजून घेण्याची वृत्ती कमी असल्याने लग्नानंतर दोनच वर्षात फारकतीचे प्रमाण वाढले आहे शिक्षणामुळे संस्कार घडण्याऐवजी मनातल्या भिंती उभे राहिल्यात सध्याच्या काळात विभक्त कुटूंबात एकमेकावरील प्रेम ,जिव्हाळा नात्यात कमी झाला आहे.

कुटूंबात प्रेमानं, स्नेहान राहील पाहिजे हा कुटुंब व्यवस्थेचा कणा आहे वृद्धाश्रम वाढले हा मोठा विषय होतो पण मी म्हणतो वृद्धाश्रम नसते या वृद्धांना कोणी सांभाळलं असतं पावसाळ्यात बेडूक मरून पडतात तशी रस्त्यावर वृद्ध माणस मरून पडली असती असे ते म्हणाले.

पूर्वी गावागावात एकत्र कुटुंबात, कुटुंबप्रमुख, गावचा प्रमुख, म्हणजे तो एक समुपदेशक होता कुटुंबातील, गावातील नात्यातील वाद त्यांच्या शब्दावर मिटवले जायचे आता कुटूंबात समुपदेशक राहिलाच नाही त्यामुळे विभक्त कुटूंबात एकमेकाला समजून घ्यायला कोणी तयार नाही त्यामुळे घरात वाद वाढले चुलीमध्ये निखारा आहे तोपर्यंत निखाऱ्याला किंमत असते निखारा चुलीच्या बाहेर फेकला की त्याचा कोळसा होतो नात्यात तसंच झालंय कुटूंबात नाती टिकवली नाही तर आयुष्याचा कोळसा होतो कुटुंबामध्ये संवेदनशीलता रुजवणे आवश्यक आहे दुसऱ्या माणसाविषयी दुःख, वेदना जपली पाहिजे एकमेकाविषयी जिव्हाळा कमी झालाय कुटुंबामध्ये, समाजामध्ये दुःखाचं कारण हव्यास आहे मिळणाऱ्या पैशात समाधान न मानता अपेक्षा जेव्हा जेव्हा वाढत जातात तेव्हा हव्यास वाढत जातो आणि मिळालेला कुठलाही पैसा आपल्याला सुख देत नाही पैसा पद प्रतिष्ठा या खोट्या प्रतिष्ठेत आपण अडकलो आहोत प्रत्येकाच्या हातात मोबाईल आल्यामुळे कुटुंबातील संवाद कमी झालाय असे ते म्हणाले.

सूत्रसंचालन श्रीमती भारती लंबाते यांनी तर आभार प्रदर्शन रतन पाटील वडघुले यांनी केले.

# आमदार अभिजीत पाटील यांच्याकडून सीना नदी काठच्या गावाच्या पूरपरिस्थितीची केली पाहणी

## शासकीय यंत्रणाना दिले सरसकट पंचनामे करण्याचे आदेश





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्यासह सोलापूर जिल्ह्यात पावसामुळे अतिवृष्टी होत माढा तालुक्यातील सीना नदीकाठच्या गावांमध्ये पूर आल्याने पुराचे पाणी पिकात शिरल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. प्रशासनास तत्काळ सरसकट पंचनामे करण्याचे निर्देश देऊन निमगाव-माढा , दारफळ, राहुलनगर, उंदरगाव- केवड , वाकाव आदी गावांमध्ये अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानाची पाहणी आज माढा तहसीलदार संजय भोसले साहेब, तालुका कृषी अधिकारी चांदने साहेब यांना सोबत घेऊन पाहणी आमदार अभिजीत पाटील यांनी केली.

सदर माढा तालुक्यातील रांझणी, रोपळे कव्हे , म्हैसगाव कुर्डवाडी या ४ मंडलात ६५ मिलिमीटर पेक्षा जास्त अतिवृष्टी झाल्याने पिकांचे नुकसान झाले आहे.

**मुख्यमंत्री यांना भेटून माढा, पंढरपूर सह सोलापूर जिल्ह्यातील झालेल्या पूर परिस्थिती नुकसानीचे पंचनामे करून मदत करण्याचे दिले पत्र**

बर्याच भागात शेतात पुराचे पाण्याबरोबर जमीन वाहून जाऊन शेतीचे नुकसान झाले आहे. शेती पिकात सर्वत्र पाणी साचलेले असल्याने पिकांचे नुकसान खुप जास्त झाले असल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली..

शेतकऱ्यांच्या अडचणीच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी म्हणून त्यांना भेटून आधार देणे आवश्यक आहे. म्हणून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन आधार देण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणा सोबत घेऊन पूरबाधीत भागात जाऊन कर्तव्य बजावले. शेतकऱ्यांना दिलासा मिळाला पाहिजे, यासाठी यंत्रणा सज्ज करण्यात आली. अनेक गावांमध्ये घरांची पडझड, पशू धनाची हानी, संसारोपयोगी साहित्य आदींचे वस्तूंचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असल्याने माढा तहसीलदार संजय भोसले यांचे कडे पत्र देऊन सरसकट पंचनामे करण्याचे पत्र दिले आहे.. माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना भेटून माढा, पंढरपूर आणि सोलापूर जिल्ह्यातील गावांना अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे तत्काळ सरसकट पंचनामे करून मायबाप सरकारकडून मदत तातडीने मिळावी यासाठी पत्र ही दिल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी सांगितले.

# गुरववाडीतील पाझर तलाव फुटण्याचा धोका सरपंचांच्या सतर्कतेमुळे टळला




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट

अक्कलकोट मौजे गुरववाडी परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुजारी शेतातील पाझर तलाव धोकादायक स्थितीत पोहोचला होता. तलाव फुटण्याचा धोका निर्माण झाल्याची माहिती ग्रामपंचायत व तलाठी मार्फत तहसीलदार कार्यालयास देण्यात आली.

तक्रार मिळताच पाटबंधारे विभागाचे अधिकारी समीर शेख तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पाहणीत तलाव फुटण्यास अवघे दीड फूट अंतर उरल्याचे स्पष्ट झाले. तातडीच्या उपाययोजनांतर्गत जेसीबीच्या मदतीने सांडद्वारे पाणी बाहेर काढण्याचे आदेश देण्यात आले.

यावेळी गावातील जेसीबी मालक सागर देवरमनी तसेच गावचे सरपंच व विकासरत्न म्हाळप्पा पुजारी यांच्या पुढाकाराने पाझर तलावाचा मार्ग मोकळा करण्यात आला. या वेळीच घेतलेल्या निर्णयामुळे संभाव्य अनर्थ टळला. याप्रसंगी सरपंच म्हाळप्पा पुजारी म्हणाले, गावाच्या हितासाठी माझे कर्तव्य पार पाडले. वेळेवर अभियंता समीर शेख यांना कल्पना देऊन त्यांच्याशी समन्वय साधला. जेसीबीच्या सहाय्याने पाण्याला मार्ग मोकळा करून दिला नसता, तर मोठा अपघात घडला असता. या कारवाईत सरपंच म्हाळप्पा पुजारी, माजी सरपंच नागपा देवरमनी, माजी डेप्युटी सरपंच कल्याण रावजी, तलाठी आलदार, ग्रामसेवक के.जी. मकानदार, जेसीबी ऑपरेटर राहुल पाटोळे, शिवानंद मुंडेवाडी, श्रीकांत गुरव, शेतकरी धनराज वंकारी, सागर वंकारी, शरणाप्पा पुजारी तसेच ग्रामपंचायत कर्मचारी शिवानंद रावजी यांच्यासह पंचक्रोशीतील नागरिक उपस्थित होते.

गावकऱ्यांच्या सहकार्यामुळे व प्रशासनाच्या वेळीच घेतलेल्या उपाययोजनांमुळे गावाला मोठ्या संकटातून दिलासा मिळाल्याचे समाधान ग्रामस्थांनी व्यक्त केले.

# महाबोधी महाविहार नागपूरची दिक्षाभुमी व महुची जन्मभुमी बौद्धाच्या ताब्यात द्या : कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

तथागत भगवान गौतम बुद्ध याना ज्ञान प्राप्ती झाली यूनोस्केने संरक्षीत केलेले जागतीक बौद्धाचे ठिकाण बौद्धगया बौद्धांचे महाबोधी विहार हे संपूर्ण बौद्धाना नियमन करणे साठी बौध्द धम्म म्हणजे संपूर्ण जगाला समतेचा संदेश दिला जातो ते सर्व मनुवादी व्यवस्था कार्यरत आहे या वृत्तीला खतपाणी न घालता देशातली सर्वच बौद्ध विहारे महाविहार हे फक्त बौद्धांच्या ताब्यात दिली पाहिजे नाहीतर आम्ही राज्य व्यापी देशव्यापी आंदोलन छेडु आणि सरकारला देण्यास भाग पाडुअसा कनखर इशारा भारतीय बौद्ध महासभेच्या धाराशिव जिल्हा अध्यक्षा राजश्रीताई कदम यांनी केला आहे .



धाराशिव जिल्हा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला यावेळी सर्व बौद्ध एकत्र ऐऊन एल्गार केला जगातील बौद्ध बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या बुद्धगया

रात बौद्ध धर्मगुरुचा ताबा आसायला हवा भारत बौद्ध भुमीतील सर्व बौद्ध विहारे बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावा समतावादी विचाराने संबंध भारत देश समानतेची वाटचाल सुरू आहे वानवादी विचाराने बौद्ध विहारामध्ये थैमान

**बौद्ध नागरीकांची न्यायासाठी वज्रमुठ; बौद्धांचा जिल्ह्याधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा**

घातले आहे या मनुवादी विचारांचा बिमोड करण्या करिता बौद्धांची वज्रमुठ तयार झाली आहे . धाराशिव जिल्ह्यातील सर्व तालुके विविध संघटना , अनेक पक्ष , अनेक संस्था या भारतीय बौद्ध महासभा यांच्यावतीने आयोजित

या करिता हा जन आक्रोश मोची भिम नगर डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक , छत्रपती शिवाजी महाराज चौक बसस्थानक ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे भरमसाठ बौद्ध अनुयायी दाखल झाले होते . अनेक मागण्याचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले आशा प्रकारची मागणी रिपाई चे प्रदेश जॉइंट सेक्रेटरी राजाभाऊ ओहाळ , वंचितचे जिल्हाध्यक्ष प्रणित डिकले , सुधिर कांबळे , भारतीय बौद्ध महासभेचे राजेंद्रकुमार निकाळजे , ड दिलीप निकाळजे , रिपाईचे प्रदेश सचिव संजय बनसोडे ,वंचितच्या महिला जिल्हाध्यक्षा अनुराधा लोखंडे , वंचितचे नेते मिलींद रोकडे , जिवन कदम , बौद्धाचार्य गुणवंत सोनवणे , पर्यटन विभाग उपाध्यक्ष विश्वास भाऊ पांडागळे , कोषाध्यक्ष कुमार ढेपे , विजयमाला धावारे ,संतोष सुरवसे सह जिल्ह्यातील सर्व बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्ये उपस्थित होत्या मोर्चाचे नेतृत्व व सुत्र संचालन जिल्हा सर चिटणीस विजय बनसोडे यांनी केले यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे सैनिक मोठया संख्येने उपस्थित होते आणि खुप चांगल्या पद्धतीने संरक्षण केले .

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव: प्रतिनिधि सुधाकर रणदिवे,धाराशिव तालुक्यातील मौजे जवळे (दु) येथील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना कर्तव्यात कसूर केल्यामुळे पंचायत समिती धाराशिव कडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

श्री प्रकाश गणपती सोनार जवळे दुमाला यांनी माहिती अधिकार अधिनियम २०२५ मधील कलम ६(१)अन्वये दि.२९/०७/२०२५ रोजी विनंती अर्ज देऊन जवळे दुमाला येथील ग्राम पंचायत मधील आपले सरकार सेवा केंद्र मागील काही वर्षापासून बंद आहे. तसेच या केंद्रातून नागरिकांना शासनाच्या ऑनलाइन सेवा मिळत नाहीत त्यामुळे त्या संबंधातील माहिती मागितली होती, परंतु ग्रामपंचायत अधिकारी श्री मेनकुदळे बी एम यांनी ३० दिवसाच्या आत माहिती पुरविणे बंधनकारक असताना देखील माहिती दिलेली नाही त्यामुळे त्यांनी कर्तव्यात कसूर करून महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियमाचा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुद्ध महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील तरतुदीनसार आपणाविरुद्ध कारवाई करण्यात येऊ नये? याबाबतचा खुलासा सदरची नोटीस मिळाल्यापासून




सात दिवसाच्या आत सादर करण्यास आदेशित केले आहे, खुलासा प्राप्त न झाल्यास किंवा असमाधानकारक असल्यास आपणाविरुद्ध योग्य ती कारवाई अनुसरण्यात येईल याबाबत गटविकास अधिकारी पंचायत समिती, धाराशिव यांनी ग्राम पंचायत अधिकारी श्री मेनकुदळे बी एम. ग्राम पंचायत जवळे दुमाला यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

## सैनिक टाकळी मगर आढळली वनरक्षक अधिकाऱ्यांना पकडण्यात यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी/ संजय चव्हाण : सैनिक टाकळी तालुका:-शिरोळ जिल्हा:-कोल्हापुर येथील मारुती मंदिर जवळ माने मळा येथे नकोशी शामराव माने, बजरंग सखाराम पाटील यांच्या घरासमोर श्रीजीत बजरंग पाटील यांनी कॉल केला वनरक्षक श्री अरुण खामकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मगर रेस्क्यू केली.



यामध्ये प्राणी मित्र अमर पाटील, निलेश तवंदकर, विश्वनाथ राजपूत, गणेश बिरंगे,जीवन पाटील, प्रणव गायकवाड, चेतन कोळी, आयुष्य गायकवाड, श्रेयस धुमाळ सहभागी होते. त्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# गळोरगी येथे आपदा मित्रांना प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी

सध्या अक्कलकोट तालुक्यासह महाराष्ट्रात पावसाने हाहाकार माजवलेला असून, अक्कलकोट तालुक्यात अनेक ठिकाणी गावचे संपर्क तुटणे, शेती पिकांचे नुकसान यासारखी अवस्था पाहवयास मिळत असताना त्याच पार्श्वभूमीवर सध्या तालुक्यात अतिवृष्टीमुळे उद्भवलेली परिस्थिती व भविष्यातील उद्भवणारी परिस्थिती लक्षात घेता पूरग्रस्त भागात आपदा मित्र हे बाहेरून मागवून घेण्यात येत होते. त्याच अनुशघाने आपल्या तालुक्यातील आपदा मित्र यांना प्रशिक्षण देऊन, तालुक्यात उद्भवलेल्या पूरग्रस्त लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्याकरिता व विविध बाबतीतचे प्रशिक्षण देऊन आपदा मित्रांच्या माध्यमातून तातडीची मदत करता येईल, त्याच अनुषंगाने आज गळोरगी तलावात प्रशिक्षण देण्यात आले.

**तहसीलदार विनायक मगर यांच्या उपस्थित प्रशिक्षण**

या प्रशिक्षणाला तहसीलदार श्री विनायक मगर साहेब, महसूल नायब तहसीलदार संजय भंडारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली आपदा मित्रांना प्रशिक्षण देण्यात आले.

दरम्यान, पुरात अडकलेल्या लोकांना काढायचे कसे पपलू आयडिया, पोहताना दम लागल्यास कसा दम काढणे, बोट फिटिंग कशी करायची, बोटी संदर्भात अनेक वेगवेगळ्या माहिती या दरम्यान शिकवण्यात आली असून, बोट कशी चालवणे व इतर अनेक बाबी या दरम्यान शिकवण्यात आल्या.

दरम्यान, गळोरगी ग्रामस्थांच्या वतीने अक्कलकोट चे तहसीलदार श्री विनायक मगर रावसाहेब व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले साहेब, व महसूल नायब तहसीलदार संजय भंडारे रावसाहेब यांचा यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी, सर्व सर्कल साहेब, सर्व तलाठी साहेब, सर्व महसूल सेवक, सर्व पोलीस पाटील व ग्रामस्थ उपस्थित होते.



**अक्कलकोट तालुक्यात सध्या पावसाने जोर धरला असल्या कारणाने तालुक्यातील काही भागात पूरग्रस्त परिस्थिती निर्माण होते त्यावेळी, आपण बाहेरून आपत्ती व्यवस्थापनची मागवायचो, आता आपण तालुक्यातच हि टीम तयार केल्याने पूरग्रस्त लोकांना तातडीची मदत मिळणे हे शक्य होईल.**

**– विनायक मगर (तहसीलदार अक्कलकोट)**

### अक्कलकोट तालुक्यातील आपदा मित्र महसूल सेवक

**प्रवीणकुमार बाबर, जाकीर कागदे, प्रविण गुंजले, हणमंत सानप, अनिल जमादार, अवधूत पुजारी, शिवशरण कोळी, शिवानंद कोळी, सचिन व्हनझेंडे, हणमंत जाधव, पोलीस पाटील श्रीशैल पाटील, दयानंद पुजारी, जर्दनबाशा कुमठे, शिवाजी कोरे, विजय चव्हाण.**

**उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत वालचंद महाविद्यालय सोलापूर येथे कृतज्ञता सोहळा संपन्न**

# नवीन शैक्षणिक धोरणानुसार मुलींना शिक्षण शुल्क माफी करण्यात आली : उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : विद्यार्थ्यांचे उज्वल भविष्य घडविण्यासाठी जी नवीन शिक्षण प्रणाली अमलात आणून मुलींसाठी शुल्क माफी करण्यात आल्याचे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

यावेळी वालचंद महाविद्यालयात आयोजित कृत्यता चा सोळाव्यात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष व मानद सचिव वालचंद शिक्षण समूह सोलापूर डॉ. रणजीत गांधी, वैभव गांधी, आई प्रतिष्ठानचे संस्थापक व सोलापूरचे ज्येष्ठ समाजसेवक मोहन डांगरे, वालचंद शिक्षण समूहाचे खजिनदार भूषण शहा त्यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




श्री. पाटील पुढे म्हणाले की, मुलींना स्वसंरक्षणाचे धडे दिले पाहिजेत. जेणेकरून ती जिथे कुठे असेल तिथे सुरक्षितच राहिली पाहिजे. मुलींना शिक्षणात प्राधान्य दिले तरच त्या पुढे येऊन शकतील. यासाठी सरकारने मुलींसाठी शिक्षणामध्ये शंभर टक्के फी माफ केली त्यांचे शिक्षणाचा खर्च १००% पूर्णपणे माफ केला आहे नवे शैक्षणिक धोरण त्यांना विकसित करेल, अशी खात्री त्यांनी व्यक्त केली.

तसेच शासनाने नवीन शैक्षणिक धोरणानुसार पाच लाख मुलींना दरमहा दोन हजार रुपये कमवा व शिका या माध्यमातून देण्याचे ठरवले आहे. आपल्या इंजिनिअरिंग कॉलेज कॅम्पस मध्ये कमवा व शिका द्वारे उद्योग निर्मिती करून आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी बनण्याचा प्रयत्न करा असे आवाहन श्री. पाटील यांनी केले.

श्री. वैभव गांधी यांनी प्रास्ताविक केले. अंतर्गत वालचंद संस्थेने केलेल्या शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कामाची माहिती दिली. प्रारंभी वालचंद महाविद्यालय येथील विद्यार्थिनींनी मंत्री महोदय यांनी नवीन शैक्षणिक धोरण लागू केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.